# मिरा-भाईंदर महानगरपालिका

## पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग

## // प्रेसनोट //

दि.13/06/2025

सर्व नागरीकांना कळविण्यात येते की, मिरा-भाईंदर शहरास स्टेम प्राधिकरण व महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.) प्राधिकरणाकडून पाणी पुरवठा करण्यात येतो.

**पावसाळ्यापुर्वी दैनंदिन देखभाल व दुरुस्तीची कामे करून घेणेकरीता स्टेम प्राधिकरणामार्फत शटडाऊन घेतला असून बुधवार दि.18/06/2025 रोजी सकाळी 09.00 ते गुरुवार दि.19/06/2025 रोजी सकाळी 09.00 वाजेपर्यत (24 तासाकरीता) मिरा-भाईंदर शहरास होणारा पाणी पुरवठा पुर्णपणे बंद राहणार आहे.** तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ (एम.आय.डी.सी.) प्राधिकरणाकडून होणारा पाणी पुरवठा सुरु राहणार आहे.

तरी स्टेम प्राधिकरणाकडून होणारा पाणी पुरवठा पुर्ववत होईपर्यत मिरा-भाईंदर शहरास पाणी पुरवठा कमी दाबाने व उशीराने होईल. नागरीकांनी पाण्याचा वापर काटकसरीने करावा व महानगरपालिकेस सहकार्य करावे.

(शरद नानेगांवकर)
कार्यकारी अभियंता
पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग
मिरा-भाईंदर महानगरपालिका